संदर्भ क्र.: एमएमसीसी/ अल्पसंख्याक शिष्यवृत्ती/२०२३-२०२४/ 304

१२ डिसेंबर, २०२३

# नोटीस

## महाराष्ट्र शासन पुरस्कृत अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२३-२०२४ करीता FRESH तसेच RENEWAL चे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरणे बाबत

वरिष्ठ महाविद्यालयातील अल्पसंख्याक विद्यर्थ्यांना सूचित करण्यात येते कि महाराष्ट्र शासन पुरस्कृत अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना योजना सन २०२३-२०२४ करीता चालू झालेली असून, सदर FRESH तसेच RENEWAL चे अर्ज https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर अर्ज भरावयाचा आहे. सर्व पात्र नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी New Applicant Registration करून स्वतःचे UserID आणि Password तयार करावे व ज्या विद्यार्थांनी या पूर्वी वरील नमूद वेबसाईटवर अर्ज भरले आहेत अश्यानी त्यांचे या पूर्वीच्या userid नेच अर्ज भरावे. नवीन तयार केला UserID आणि Password हा कायमस्वरूपी लागणार असल्या कारणाने त्याची योग्य अशी नोंद करून ठेवावी. सदर अर्ज भरतेवेळी नमूद केलेले सर्व ओरिजनल कागपत्रे २५६ kb च्या आत jpeg स्वरूपात अपलोड करावे.

**चालू शैक्षणिक वर्षात माहिती भरत असताना वरिष्ठ महाविद्यालयातील विध्यार्थ्यानी Marathwada Mitra Mandal's College of Commerce (३४८९) असे महाविद्यालयाचे नाव निवडावे. RENEWAL करीत असताना Online दिलेल्या सूचना काटेकोरपणे वाचून त्याप्रमाणे Profile Update करावा, उदाहरणार्थ चालू शैक्षणिक तसेच इतर आवश्यक ते बदल करूनच अर्ज वरील शिष्यवृत्तीस लागू करावा.**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | १० वी, १२ वी/ ग्रॅज्युएशन उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| २. | मागील शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ ची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स ) ऑनलाईन निकाल असल्यास महाविद्यालयाने साक्षांकित केलेली प्रत |
| ३. | १० वी /१२ वी /ग्रॅज्युएशन पदवी सोडल्याचा दाखला (झेरॉक्स) |
| ४. | विद्यार्थ्यांच्या नावाचे डोमेसाइल सर्टिफिकेट (झेरॉक्स) |
| ५. | स्वयं घोषित अल्पसंख्याक असल्याचे प्रमाणपत्र (Original) |
| ६. | कौटूंबिक उत्पन्न आर्थिक वर्ष २०२२-२०२३ चा तहसीलदार चा दाखला ( उत्पन्न मर्यादा योजनेच्या नियमांनुसार\)(Original) |
| ७. | आधारकार्ड (झेरॉक्स) |
| ८. | राशनकार्ड (झेरॉक्स) |
| ९. | विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकचे पहिले पान (Original) |
| १०. | चालू शैक्षणिक वर्षाची फी भरल्याची पावती (झेरॉक्स) अथवा महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट |
| ११. | चालू वर्षा करीता पालकांचे अपत्यां बाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र |

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतःचा मोबाइल नंबर व बचत खाते हे त्वरित आधारकार्डशी संलग्नित करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्यांची शिष्यवृत्ती जमा न झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील. तसेच ऐकावेळेला एकच शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्याला घेता येईल.

अचूक अर्ज भरून झाल्यावर वरील कागदपत्रांसोबत (नमूद केलेल्या क्रमानुसार) आवश्यक त्या सर्व कागदपत्रासोबत महाविद्यालयाच्या स्कॉलरशिप विभागात सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत जमा करावे.

MAHADBT पोर्टल वर ऑनलाईन अचूक अर्ज भरलेलया तसेच महाविद्यालयात अर्जाची प्रत व इतर वरील नमूद कागपत्रे सादर केलेल्या अर्जांवरच महाविद्यालय स्तरावरून कार्यवाही केली जाईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

M.M. COLLEGE OF COMMERCE ★ PUNE-4

**डॉ. देविदास गोल्हार**
प्राचार्य

प्रत: १. सर्व शाखा प्रमुखांना विद्यार्थ्यांना सूचित करण्यासाठी
सोबत: RENEWAL करण्याबाबची कार्यपद्धती जोडली आहे.